आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ जुलै २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनाचा यशस्वी दौरा संपवून ब्राझीलला पोहोचले, १७व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होणार

- आषाढी एकादशीनिमीत्त राज्यात भक्तिमय वातावरण, पंढरपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न

- अमेरिकेत टेक्सास राज्यात आलेल्या भीषण पुरामुळे आतापर्यंत किमान ४९ लोकांचा मृत्यू

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताला विजयासह मालिकेत बरोबरी साधण्याची संधी

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनाचा यशस्वी दौरा संपवून आज ब्राझीलची राजधानी रिओ दी जानेरो इथं पोहोचले. भारताच्या प्रधानमंत्र्यांनी अर्जेंटिलाना भेट द्यायची ५७ वर्षांतली ही पहिली वेळ आहे. या भेटीची सुरुवात मोदी यांनी अर्जेंटिनाचे राष्ट्रपिता आणि स्वातंत्र्यसैनिक जनरल जोसे डी सॅन मार्टिन यांच्या स्मारकाला आदरांजली वाहून केली. त्यानंतर त्यांनी राष्ट्राध्यक्ष जेवियर मिलेई यांच्याशी बैठक घेतली आणि व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण, अंतराळ, आरोग्य आणि औषधनिर्मिती यासह द्विपक्षीय सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर भर दिला. अर्जेंटिनाच्या दौऱ्यानंतर प्रधानमंत्री मोदी ब्राझील इथं १७व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. यादरम्यान ते जागतिक शांतता आणि सुरक्षा, प्रशासन सुधारणा, कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर, हवामान कृती, जागतिक आरोग्य, आर्थिक बाबी यासह इतर महत्त्वाच्या जागतिक मुद्द्यांवर विचारविनिमय करणार आहेत. तसंच अनेक द्विपक्षीय बैठकाही ते घेतील. ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्याशीही प्रधानमंत्री द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<><><><>**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी काल रिओ दी जानेरो इथं ब्रिक्स देशांच्या अर्थमंत्र्यांशी बैठका घेऊन धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट करण्यासाठी विविध क्षेत्रातला सहयोग वाढवण्यासह द्विपक्षीय सहकार्याच्या इतर मुद्द्यावर चर्चा केली. ब्रिक्स देशांचे अर्थमंत्री आणि केंद्रीय बँकांच्या गव्हर्नर्सच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, सीतारमण यांनी रशियाचे अर्थमंत्री अँटॉन सिलुआनोव्ह यांच्याशी आर्थिक क्षेत्रातल्या द्विपक्षीय सहकार्याबद्दल, तसंच न्यू डेव्हलपमेंट बँक या विषयावर संवाद साधला.

चीनचे अर्थमंत्री लान फोआन यांच्याशी चर्चेदरम्यान सीतारमण यांनी, समावेशक जागतिक विकास आणि नवोन्मेषाच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावण्याची क्षमता भारत आणि चीनकडे असल्याचं सांगून द्विपक्षीय सहकार्य आणखी बळकट करण्याची गरज अधोरेखित केली.

ब्राझीलचे अर्थमंत्री फर्नांडो हडड यांच्याशी बोलताना निर्मला सीतारमण यांनी ग्लोबल साऊथ, कॉप-३० आणि पर्यावरणीय अर्थव्यवस्था, तसंच संयुक्त राष्ट्र, जी-२०, ब्रिक्स आणि जागतिक व्यापार संघटना अशा मंचांमध्ये सहभागावर भर दिला.

**<><><><>**

पांडुरंगाने राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी आशीर्वाद द्यावा, असं साकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठलाला घातलं. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आज पहाटे फडणवीस यांनी सपत्निक, मानाच्या वारकरी दांपत्यासह विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीनं मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि इतर यावेळी उपस्थित होते.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणं हा सगळ्यांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. वारीची परंपरा सतत वाढत असून या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी असल्याची बाब मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केली. अशी प्रथा जगाच्या पाठीवर इतर कुठेही नाही. वारीनं खऱ्या अर्थानं भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. शासकीय महापूजेच्या मानाच्या वारकरी दांपत्याचा सन्मान, तसंच पायी स्वच्छता आणि सामाजिक

विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कारानं सन्मानही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झाला.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना आषाढी एकादशीनिमित्त शुभेच्छा दिल्या. विठूमाऊली आपल्या समाजाला आनंदाची आणि समृद्धीची वाट दाखवेल, अशी भावना त्यांनी समजामाध्यमावरच्या पोस्टद्वारे व्यक्त केली.

<><><><>

अशूरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागात पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्य आणि न्यायासाठी करबाला इथं दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या निमित्तानं या बलिदानाचं स्मरण करून, यातून लोकांना बिकट परिस्थितीत सत्याच्या बाजूनं उभं राहण्याची प्रेरणा मिळत असल्याचं प्रतिपादन त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे केलं आहे.

<><><><>

अमेरिकेत टेक्सास राज्यात आलेल्या भीषण पुरामुळे आतापर्यंत किमान ४९ लोकांचा मृत्यू झाला असल्याचं वृत्त आहे. मृतांमध्ये १५ लहान मुलांचा समावेश असून, एका खाजगी युवा शिबिरातून २७ मुलं बेपत्ता असल्याची माहिती तिथल्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. पुराच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ८५० लोकांना वाचवण्यात यश आलं असल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

दरम्यान, या भागात आणखी पाऊस पडून पुन्हा पूर येण्याची शक्यता तिथल्या हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

टेक्सासचे गव्हर्नर ग्रेग ॲबॉट यांनी शोधकार्याला गती देण्यासाठी आपत्कालीन परिस्थितीच्या घोषणेला मुदतवाढ दिली आहे. मदत आणि बचाव कार्यासाठी आपलं प्रशासन स्थानिक प्रशासनासोबत समन्वयानं काम करत असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

<><><><>

अमेरिकन उद्योजक एलॉन मस्क यांनी काल ‘एक्स’वर ‘अमेरिका पार्टी’ या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली. रिपब्लिकन्स आणि डेमॉक्रॅट्स या दोन पक्षांच्या वर्चस्वाला आव्हान देण्याचा यामागचा उद्देश आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी मतभेद झाल्यानंतर काही दिवसांतच मस्क यांनी ही घोषणा केली.

**<><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यावर भारतानं मजबूत पकड घेतली आहे. काल सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं विजयासाठी दिलेल्या ६०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दुसऱ्या डावात इंग्लंडच्या ३ बाद ७२ धावा झाल्या होत्या. त्यामुळं इंग्लंड अजूनही ५३७ धावांनी पिछाडीवर आहे.

त्याआधी, भारताचा कर्णधार शुभमन गिल यानं दुसऱ्या डावातही १६१ धावांची धडाकेबाज शतकी खेळी केली. पहिल्या डावातल्या द्विशतकी खेळीसह या सामन्यात त्यानं एकूण ४३० धावा केल्या. या विक्रमी खेळीनंतर, गिल ग्रॅहम गूच यांच्यानंतर एका कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करणारा गिल हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू ठरला आहे. भारतानं आपला दुसरा डाव ६ बाद ४२७ धावांवर घोषित केला.

त्यानंतर पुन्हा एकदा मोहम्मद सिराज आणि आकाशदीप यांनी भेदक गोलंदाजी करत, केवळ ५० धावांतच इंग्लंडच्या जॅक क्राऊली, बेन डकेट आणि ज्यो रूट या आघाडीच्या फलंदाजांना माघारी धाडलं.

आज सामन्याचा शेवटचा दिवस असून, या सामन्यात विजय मिळवून मालिकेत बरोबरी साधण्याची मोठी संधी भारताकडे आहे.

**<><><><>**

विम्बल्डनमध्ये आज महिला एकेरीत अग्रमानांकित अरीना साबालेंका हिचा सामना एलीजे मर्टन्स हिच्याविरुद्ध रंगणार आहे. पुरुष एकेरीत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला, गतविजेता कार्लोस अल्काराज याच्यासमोर आंद्रे रुब्लेव्ह याचं आव्हान असेल. तर पाचव्या क्रमांकावर असलेला टेलर फ्रिट्झ, जॉर्डन थॉम्पसन याच्याविरुद्ध मैदानात उतरेल. दरम्यान, या स्पर्धेत महिला एकेरीत काल क्लारा टॉसन हिनं अकराव्या क्रमांकावर असलेली एलेना रिबाकीना हिला थेट सेट्समध्ये हरवलं. तर पुरुष

एकेरीत अग्रमानांकित यानिक सिनर यानं पेद्रो मार्टिनेझ याच्यावर ६-१, ६-३, ६-१ अशी सहज मात केली.

**<><><><>**

हिमाचल प्रदेशाच्या बहुतांश भागात आज सकाळपासून जोरदार पाऊस सुरू आहे. राज्यातल्या मंडी, कांग्रा आणि सिरमौर जिल्ह्यांसाठी हवामान विभागानं अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे, तर शिमला, सोलन, हमीरपूरसह नऊ जिल्ह्यांमध्ये पुराची शक्यता व्यक्त केली आहे. लोकांनी अनावश्यक प्रवास टाळावा असा सल्ला स्थानिक प्रशासनानं दिला आहे.

दरम्यान, हवामान विभागानं उद्याही हिमाचल प्रदेशासह, मध्य महाराष्ट्रात घाट माथ्यासह कोकणात अतिवृष्टीची शक्यता व्यक्त केली आहे. याशिवाय उत्तराखंड, राजस्थान, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गोवा आणि गुजरातमध्येही काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><>//**